नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २२१ | Issue - 221 | वार शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४ | Blow- Saturday Date 28 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# उत्तर महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा फटका

## जळगाव जिल्ह्यात गारपीट; शेतकरी हवालदिल, विदर्भात वादळी पाऊस

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नाशिक/नागपूर : बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिकसह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली. जळगाव जिह्यातील यावल तालुक्यात गारपीटही झाली आहे. या पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव व नंदुरबार जिल्ह्यांत जोरदार वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी दिली. जळगाव शहरात अवघ्या २० मिनिटांत १० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. यावल तालुक्यातील बामणोद गावासह परिसरात जोरदार वाऱ्यांसह पाऊस व गारपीट झाली. या गारपिटीमुळे पंचक्रोशीतील केळीच्या बागांचे मोठे नुकसान झाले. हवामान विभागाकडून जळगाव जिल्ह्यात अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.



त्यानुसार शुक्रवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. आठ ते १० किलोमीटर वेगाने वारेदेखील वाहत होते. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास जळगाव शहरात पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या या पावसामुळे जळगावकरांची चांगलीच तारांबळ उडाली.

विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांना वादळी पावसाने झोपडून काढले. नागपुरात सायंकाळी सहानंतर अनेक ठिकाणी वादळी पावसाची हजेरी लागली. तसेच अकोला, अमरावती, बुलढाणा व वर्धा येथे तर जोरदार पाऊस झाला. नागपूरसह वाशिम, यवतमाळ व गोंदिया येथे विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस झाला. आज, शनिवारीसुद्धा विदर्भात वादळी पावसाचा अंदाज आहे. वातावरणातील या बदलांमुळे थंडीत अचानक वाढ होण्याची शक्यता आहे.

अनेकभागात शुक्रवारी सायंकाळी सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने बाजारपेठांतील विक्रेते, व्यावसायिक, खरेदीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. तर, पावसामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये विशेषत: द्राक्षे व कांदा उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# जात प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारने मराठा समाजातील मुलांना सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केल्यावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र देणे बंद केले. त्यामुळे 'ईडब्ल्यूएस' प्रवर्गातून व्यावसायिक

## व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांना दिलासा

अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना 'एसईबीसी' प्रमाणपत्र सादर करण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) सक्ती करण्यात येत आहे. परिणामी अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश अडचणीत आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची होणारी अडचण लक्षात घेत जात प्रमाणपत्र सादर करण्यास दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी देण्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना मराठा समाजाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून प्रवेश घेताना 'ईडब्ल्यूएस' प्रम



ाणपत्र सादर केले. मात्र प्रवेश प्रक्रियेदरम्यान राज्य सरकारने मराठा समाजातील मुलांना 'ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्र देणे बंद केले. त्याऐवजी 'एसईबीसी' प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली. परिणामी राज्य सीईटी सेलने मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना 'एसईबीसी' प्रमाणपत्र सादर करण्याच्या सूचना केल्या. त्यामुळे मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांकडे सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांनी 'एसईबीसी' प्रमाणपत्र मागण्यास सुरुवात केली. दोन महिन्यांत 'एसईबीसी' प्रमाणपत्र मिळणे अवघड आहे. त्यामुळे यंदा 'ईडब्ल्यूएस' अंतर्गत प्रवेश अर्ज केलेल्या मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश 'ईडब्ल्यूएस' अंतर्गतच निश्चित करण्यात यावेत. जेणेकरून विद्यार्थ्यांचा मानसिक व आर्थिक त्रास कमी होईल, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

# कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली

## डॉ.मनमोहन सिंग यांच्याप्रती सोनिया गांधींनी व्यक्त केल्या भावना



नवी दिल्ली : देशाचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचं २६ डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास निधन झालं. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. देशाच्या प्रगतीत आणि अर्थिक विकासात डॉ.मनमोहन सिंग यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी दूरदृष्टीने अनेक योजना सुरू केल्या, त्याचा थेट फायदा सामान्य नागरिकांना झाला आहे. त्यामुळे त्यांच्या निधनामुळे अवघ्या देशावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनावर काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

काँग्रेसच्या अधिकृत एक्स खात्यावरून या भावना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सोनिया गांधी म्हणतात, डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाने आपण एक असा नेता गमावला आहे जो हुशार, कुलीनपणाचा आणि नम्रतेचा प्रतिक होता. त्यांनी आपल्या देशाची मनापासून सेवा केली. काँग्रेस पक्षासाठी एक तेजस्वी आणि प्रिय मार्गदर्शक होते. त्यांची करुणा आणि दृष्टीने त्यांनी कोट्यवधी भारतीयांचे जीवन बदलले आणि सशक्त केले. ते मनापासून भारतातील लोकांवर प्रेम करत होते. त्यांचे सल्ले आणि विचार आपल्या देशातील राजकीय विकासात प्रभावित ठरले. जगभरातील नेते आणि विद्वानांनी त्यांचा आदर आणि कौतुक केले, ते प्रचंड शहाणपण आणि उंचीचे राजकारणी म्हणून गौरवले गेले. डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यांच्याकडे असलेल्या प्रत्येक उच्च पदावर तेज आणि वेगळेपणा आणला. यामुळे भारताला अभिमान आणि सन्मान मिळाला, असंही सोनिया गांधी म्हणाले. माझ्यासाठी डॉ.मनमोहन सिंग यांचे निधन हे एक अतिशय वैयक्तिक नुकसान आहे. ते माझे मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक होते. ते खूप सौम्य होते. सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्यांप्रती त्यांची बांधिलकी खोल आणि अतूट होती. त्यांच्याबरोबर वेळ घालवायचा म्हणजे त्यांच्या ज्ञानाने आणि बुद्धिमत्तेने प्रबुद्ध होऊन, त्यांच्या प्रामाणिकपणाने आणि सचोटीने प्रेरित होऊन आणि त्यांच्या अस्सल नम्रतेने विस्मित होत असे, असे कौतुद्गारही त्यांनी काढले. त्यांनी आपल्या राष्ट्रीय जीवनात अशी पोकळी सोडली आहे जी कधीही भरून निघणार नाही. आम्ही काँग्रेस पक्षात आहोत आणि भारतातील जनतेला सदैव अभिमान आणि कृतज्ञता राहील की आम्हाला डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारखा नेता लाभला ज्यांचे भारताच्या प्रगती आणि विकासात योगदान अतुलनीय आहे, असं सोनिया गांधी म्हणाल्या.

# माहिती अधिकार कार्यकर्ते कृष्णा यांची केंद्राकडे सुरक्षेची मागणी; 'मुदा' घोटाळा प्रकरण; पंतप्रधान, गृहमंत्र्यांना पत्र

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बंगळूरु : कर्नाटकातील 'मुदा घोटाळा' उघडकीस आणणारे माहिती अधिकार कार्यकर्ते स्नेहमोयी कृष्णा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून केंद्राकडून त्वरित सुरक्षा देण्याची विनंती केली आहे, यापूर्वी हीच विनंती त्यांनी कर्नाटक सरकारला केली होती, परंतु सरकारने नकार दिला होता. 'मुदा घोटाळा' प्रकरणात सर्वप्रथम कृष्णा यांनी तक्रार दाखल केली होती. कृष्णा यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती, इतर नेते आणि प्रभावशाली व्यक्तींच्या नावे म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी (मुदा) अंतर्गत १४ भूखंडांचे बेकायदेशीर वाटप केल्याची तक्रार केली असल्याचा उल्लेखदेखील पत्रात केला आहे.



२६ डिसेंबर रोजी लिहिलेल्या या पत्रात त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कारवाईसही नकार दिला त्यामुळेच न्यायालयात तक्रार दाखल केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

तक्रारीची दखल घेत न्यायालयाने लोकायुक्त चौकशीचे निर्देश दिले, असा दाखला देत याप्रकरणी गुन्हा दाखल झाला ज्यात मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना आरोपी क्रमांक एक ठरविण्यात आल्याचा उल्लेखदेखील त्यांनी केला आहे.

घोटाळा उघडकीस आणल्यामुळे अनेक खोटे गुन्हे दाखल करून तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा दावादेखील त्यांनी पत्रात केला आहे. यासोबतच जनागुडू टाऊन, देवराजा आणि कृष्णराजा या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहितीदेखील कृष्णा यांनी पत्रात नमूद केली. एवढेच नव्हे तर दबाव आणण्याचा त्यांचा प्रयत्न असून प्रकरण मागे घेण्यासाठी पैसे देण्याचे आमिष दिल्याचा आरोपदेखील कृष्णा यांनी केला.

# घाटकोपर येथे कुर्ला अपघाताची पुनरावृत्ती; टेम्पोने पाच जणांना धडकलं, एका महिलेचा जागीच मृत्यू!

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : कुर्ला येथे झालेला बेस्ट बसचा अपघात ताजा असतानाच घाटकोपर येथे एका टेम्पोने चाप जणांना धडक दिली आहे. शुक्रवारी सायंकाळी हा प्रकार घडला. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून तीन महिला आणि एका जखमी पुरुषाला घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, ही घटना सायंकाळी साडेसहाच्या सुमारास चिराग नगर भागातील मासळी मार्केटमध्ये घडली. टेम्पो चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. उत्तम खरात (२५) असे चालकाचे नाव असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. तो दारूच्या नशेत होता का, याचा तपास पोलीस करत आहेत.



प्रीती पटेल (३५) असे मृत महिलेचे नाव असून ती घाटकोपरमधील पारशीवाडी येथील रहिवासी आहे. इतर चार जखमींमध्ये रेश्मा शेख (२३), मारुफा शेख (२७), तोफा शेख (२८) आणि मेहराम अली शेख (२८) यांचा समावेश आहे.

काही दिवसांपूर्वी कुर्ल्यात बेस्ट बसचा अपघात झाला होता. या अपघातात जवळपास आठ लोकांचा मृत्यू झाला. चालकाने मद्यपान केल्याचं प्राथमिक अहवालातून समोर आलं असून याप्रकरणी चौकशी सुरू आहे. दरम्यान, हे प्रकरण ताजं असतानाच घाटकोपर येथे अपघात घडलाय. हा टेम्पो नारायण नगरहून घाटकोपरच्या दिशेने भरधाव वेगाने येत होता. हा टेम्प बाजारात शिरला आणि तेथे असलेल्या स्टॉल्सचा उडवत निघाला. यामध्ये एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर पाच ते सहाजण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतलं आहे.

कुर्ला पश्चिम येथील महापालिकेच्या एल विभाग कार्यालयासमोर गेल्या सोमवारी रात्री १० च्या सुमारास भीषण अपघात झाला होता. भरधाव वेगात धावणाऱ्या बेस्टच्या बसने अनेक पादचारी व वाहनांना धडक दिली. या अपघातामध्ये ४९ जण जखमी झाले, तर सात जणांचा मृत्यू झाला होता. जखमींपैकी शीव रुग्णालयात दाखल असलेल्या आणखी एकाचा सोमवार, १६ डिसेंबर रोजी मृत्यू झाला. बेस्ट बसच्या भीषण अपघातातील मृतांची संख्या आठ झाली आहे.

## दररोज सरासरी ८४४ शेतकऱ्यांना लाभ

## महावितरणचे लोकेश चंद्र यांनी दिली माहिती

# सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात प्रथम

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबईः शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. या योजनेच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात दररोज सरासरी ८४४ पंप राज्यात बसविण्यात आल्याची माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी दिली.

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दिष्ट्य ठेवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दीर्घकाळ पैसे भरूनही पंप मिळाले नसल्याचा (पेड पेंडिंग) प्रश्न सोडविण्याचा निर्धार त्यांनी केला असून त्यानुसार या योजनेला गती देण्यात आली आहे.



संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठल्याचे लोकेश चंद्र यांनी सांगितले. या योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यात महावितरणच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात २१ हजार ९५१ सौर कृषी पंप बसविण्यात आले, अर्थात दररोज सरासरी ८४४ पंप बसविण्यात आले. ही आतापर्यंतची कोणत्याही महिन्यातील सर्वाधिक सरासरी आहे. सन २०१५ ते २०२३ पर्यंत विविध योजनेत एक लाख ८० हजार सौर पंप बसविण्यात आले होते. तथापि, यावर्षी मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात एक लाख ५८ हजार सौर पंप बसविण्यात आले आहेत.

# मोबाईल चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मागील काही दिवसापासून मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले आहे. यात शहरातील विविध पोलिस ठाण्यात मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांची नोंद असलेल्या मोबाईल चोरांना सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीचे ३२ हजार रुपये किंमतीचे चार मोबाईल हस्तगत करण्यात आले. तसेच एक घरफोडीचा असे एकूण पाच गुन्हे शहर गुन्हे शाखाकडून उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर शहर गुन्हे शाखेकडील सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे व त्यांच्या पथकास शहरातील मोबाईल फोनची जबरीने चोरी करणार्या गुन्हेगारांची व गुन्ह्यांची माहिती घेताना एमआयडीसी पोलीस ठाणे, सदर बझार पोलीस ठाणे येथील दोन व जोडभावी पेठ पोलीस ठाण्यातील याप्रमाणे चार गुन्ह्यात मोबाईल जबरदस्त हिसका मारून चोरी केलेल्या गुन्ह्यांची नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली. याबाबत अधिक माहिती घेताना संशयित आरोपी शंकर चंदुरसिंग मैनावाले (वय-२५,रा.अडकी हॉस्पिटलच्या पाठीमागे,आर.के. स्टुडिओच्या बोळात,बेडर पूल),महेश हनुमान मौलावाले (वय-२३,रा.महात्मा फुले नगर,सिद्धार्थ चौक,कनक अपार्टमेंटच्या समोर),अजय मनोज जमादार (वय-२३,रा.जय भारत शाळेच्या पाठीमागे,बापूजी नगर) यांनी सदरचे गुन्हे केल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार संशयित आरोपी महेश मौलावाले व शंकर मैनावाले यांना ताब्यात घेतले.दोन्ही आरोपींकडून वर नमूद गुन्ह्यातील चोरलेल्या ३२ हजार किमतीचे चार मोबाईल जप्त करण्यात आले.तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे व त्यांच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे विजय विष्णू कांबळे (वय-२३,रा.हब्बु वस्ती) व सचिन शंकर कदम (वय-४६,रा.लक्ष्मी विष्णू चाळ,महादेव मंदिर जवळ) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सलगर वस्ती पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्ह्यातील चोरीचे पितळी हंडे,तांब्याचे पातेले व इतर साहित्य असा अकरा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तसेच विकी किशोर फटफटवाले (वय-२२,रा.बालाजी मठ जवळ १३७,लोदी गल्ली,उत्तर सदर बझार) हा चोरी केलेला मोबाईल विक्रीसाठी आल्याची माहिती मिळाली. त्यावरून त्याची विचारपूस केली असता त्याच्याकडून आठ हजार रुपये किमतीचा मोबाईल सात रस्ता येथील सुधा इडली गृह येथे चोरी केल्याचे त्याने सांगितले.

## संपादकीय....

# गारपीटीने त्रस्त

उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव व नंदुरबार जिल्ह्यांत जोरदार वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी दिली. जळगाव शहरात अवघ्या २० मिनिटांत १० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. यावल तालुक्यातील बामणोद गावासह परिसरात जोरदार वाऱ्यांसह पाऊस व गारपीट झाली. या गारपिटीमुळे पंचक्रोशीतील केळीच्या बागांचे मोठे नुकसान झाले. हवामान विभागाकडून जळगाव जिल्ह्यात अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार शुक्रवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. आठ ते १० किलोमीटर वेगाने वारेदेखील वाहत होते. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास जळगाव शहरात पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या या पावसामुळे जळगावकरांची चांगलीच तारांबळ उडाली. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिकसह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली. जळगाव जिह्यातील यावल तालुक्यात गारपीटही झाली आहे. या पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांना वादळी पावसाने झोपडून काढले. नागपुरात सायंकाळी सहानंतर अनेक ठिकाणी वादळी पावसाची हजेरी लागली. तसेच अकोला, अमरावती, बुलढाणा व वर्धा येथे तर जोरदार पाऊस झाला. नागपूरसह वाशिम, यवतमाळ व गोंदिया येथे विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस झाला. आज, शनिवारीसुद्धा विदर्भात वादळी पावसाचा अंदाज आहे. वातावरणातील या बदलांमुळे थंडीत अचानक वाढ होण्याची शक्यता आहे. अनेकभागात शुक्रवारी सायंकाळी सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने बाजारपेठांतील विक्रेते, व्यावसायिक, खरेदीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. तर, पावसामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये विशेषत: द्राक्षे व कांदा उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# प्रशासक ते पंतप्रधान : अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहनसिंह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नंतर सलग १० वर्षे पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी काम केले. २००४ मध्ये काँग्रेस पक्षाने यूपीए सरकार मध्ये त्यांना पंतप्रधान पदाचा बहुमान दिला, २००४ पासून २०१४ पर्यंत ते भारताचे पंतप्रधान होते. त्यानंतर सलग १० वर्ष त्यांनी पंतप्रधान म्हणून देशसेवा केली. भारताचे १४ वे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत व अभ्यासक म्हणून ओळखले जात होते. तसेच त्यांचा कामाप्रती असलेला व्यासंगी व शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे त्यांच्याकडे आदराने बघितले जात होते. मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. त्यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व पंजाब विद्यापीठापासून इंग्लंड मधील केम्ब्रिज विद्यापीठा पर्यंत विस्तारलेले होते. १९५७ साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९६२ साली त्यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी.फील संपादन केली. त्यांचे 'इंडियाज एक्स्पोर्ट ट्रेंड्स एण्ड प्रोस्पेक्ट्स फोर सेल्फ ससटेन्ड ग्रोथ' हे पुस्तक भारताच्या अंतस्थ व्यापारी धोरणाची समीक्षा करणारे आहे.

डॉ. मनमोहन सिंह हे काँग्रेस पक्षाचे सदस्य असून राज्यसभेत आसामचे प्रतिनिधित्व करीत होते. यापूर्वी ते १९९१ साली पी.व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री होते. त्या काळात त्यांनी केलेल्या आर्थिक सुधारणा आणि त्यानंतर झालेल्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांची कार्यक्षम राजकारणी म्हणून प्रतिमा बनली आहे. मनमोहनसिंहांच्या वडिलांचे नाव गुरुमुखसिंह आणि आईचे नाव अमृतकौर. मनमोहनसिंह हे अर्थशास्त्रात उच्चशिक्षित होते. संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार आणि विकास विभागात काम करीत असतांना, भारताचे तत्कालीन विदेश व्यापारमंत्री ललित नारायण मिश्रा यांनी मनमोहनसिंहांची आपल्या खात्यात सचिव म्हणून नियुक्ती केली होती.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

पंजाब विद्यापीठ व प्रथितयश दिल्ली स्कूल ऑफ इकोनोमिक्स मध्ये प्राध्यापक म्हणून काम करत असताना त्यांची शैक्षणिक ओळख अधिक समृद्ध झाली. या काळात युएनसीटीएडी सचिवालयात त्यांनी काही काळ काम पहिले होते. त्यातूनच त्यांची १९८७ आणि १९९० या काळात जीनिव्हा येथील साउथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. त्यांनी १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली व त्यांचा सरकारमध्ये प्रवेश झाला. त्यातूनच १९७२ साली त्यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी अर्थमंत्रालयात भूषविलेल्या अनेक महत्वाच्या पदांमध्ये अर्थ मंत्रालयाचे सचिवपद, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद आदी पदांचा समावेश होतो.

१९९१ पासून राज्यसभा या वरिष्ठ सभागृहात त्यांनी खासदारपद भूषविले होते. १९९८-२००४ च्या दरम्यान त्यांनी राज्यसभेत विरोधी पक्ष नेत्याची भूमिकाही पार पडली आहे. २२ मे २००४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकानंतर त्यांनी पहिल्यांदा व २२ मे २००९ रोजी त्यांनी दुसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानल्या जाणाऱ्या १९९१-१९९६ या पाच वर्षांच्या काळात त्यांनी भारताचे अर्थ मंत्रिपद भूषविले. भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष धोरण तयार करण्यात त्यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. हा काळ त्यांच्या नावाशी घट्ट जोडला गेला.

त्यांच्या कारकीर्दीत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अनेक महत्वाच्या पुरस्कारांपैकी भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण पुरस्कार (१९८७), भारतीय विज्ञान काँग्रेस मध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्म शताब्दी सन्मान (१९९५), अर्थ मंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवार्ड (१९९३ व १९९४), केम्ब्रिज विद्यापीठाचा ॲडम स्मिथ पुरस्कार (१९५६), केम्ब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल 'राईट पुरस्कार' असे काही विशेष पुरस्कार आहेत. याशिवाय जपान निहोन कायझाई शिम्बून सारख्या अनेक संस्थांनी डॉ. मनमोहनसिंग यांना सन्मानित केले आहे. केम्ब्रिज व ऑक्सफोर्ड सारख्या अनेक विद्यापीठांकडूनही त्यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली होती. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संघटनांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले असुन १९९३ मध्ये सायप्रस येथे राष्ट्रकुल प्रमुखांच्या बैठकीत आणि व्हिएन्ना येथे मानवाधिकारावरील जागतिक परिषदेत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. 'द क्सिडेंटल प्राइम मिनिस्टर'



या चित्रपटात अनुपम खेर यांनी मनमोहनसिंहांची भूमिका केली होती. या सिनेमात काँग्रेसवर आणि गांधी घराण्यावर टीका केलेली असल्याने या सिनेमाच्या प्रदर्शनाला काँग्रेस पक्षाने विरोध केला होता. तसेच 'प्रधानमंत्री' या नावाची एक मालिका एका टी.व्ही चॅनेलवर प्रसारित झाली होती. गेल्या ६५ वर्षात १३ पंतप्रधानांच्या कार्यकाळात देशात झालेले बदल मांडण्याचा हा अनोखा प्रयत्न होता.

त्यातील काही भागात मनमोहन सिंग यांची देखील कथा चित्रित केली गेली होती. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे अत्यंत शांत, विनम्र आणि मितभाषी व्यक्तिमत्व होते. देशाच्या अर्थव्यवस्थेला सावरण्याची त्यांची क्षमता होती, हे त्यांनी अर्थमंत्री असतांना दाखवून दिले होते. त्यांची अर्थतज्ज्ञ म्हणून कामगिरी जागतिक दर्जाची होती. त्यांच्या निधनाने भारत देशाची मोठी हानी झाली आहे. देशाने एक जागतिक दर्जाचा अर्थतज्ज्ञ विद्वान गमावला आहे. अर्थविश्वाचा भारतीय कोहिनूर हरपला आहे. त्यांचा शांत विनम्र स्वभाव आणि अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांची विद्वत्तेचा अमीट ठसा भारतीय राजकारणावर नेहमीच कायम राहील. वयोमानाशी संबंधीत आजारांवर उपचारादरम्यान शर्थीचे प्रयत्न करुनही त्यांचे प्राण वाचू शकले नाही आणि शेवटी २६ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली, अशा या महान नेत्याला विनम्र, भावपूर्ण आदरांजली !

# निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी खा. भगरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अर्थवाहिनी समजल्या जाणाऱ्या निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदाची निवड प्रक्रिया सहकार अधिकारी तथा

## व्हा चेअरमनपदी वाजे तर कार्यवाहपदी राहुल दवते

निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश मुरडकर यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या सभागृहात पार पाडण्यात आली,

त्यांना सहायक म्हणून रतन दिवटे यांनी कामकाज बघितले,यावेळी चेअरमनपदासाठी खासदार भास्करराव भगरे यांचा एकमेव अर्ज मुदतीत दाखल झाला त्यांना सूचक नगरसेवक साहेबराव बर्डे तर अनुमोदन किरण जाधव होते,व्हा चेअरमनपदी बाळकृष्ण वाजे यांचा एकमेव अर्ज आला त्यांना सूचक बी. आर. सोनवणे होते तर अनुमोदक भगीरथ सोनवणे होते,निर्धारित वेळेत दोघांचेही एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश मुरडकर यांनी सदर निवडी बिनविरोध झाल्याचे जाहीर केले,




यानंतर झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत कार्यवाह पदासाठी राहुल दवते यांच्या अर्जावर सूचक बाळासाहेब गुंजाळ तर अनुमोदक हेमलता जाधव यांनी स्वाक्षरी केली निर्धारित वेळेत एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांचीही निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले,यावेळी नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला,तसेच त्यानंतर झालेल्या सभेमध्ये गोदावरी माध्यमिक विद्यालय, शिंगवे येथील बाळकृष्ण शिंदे तसेच स्व. माधवराव बोरस्ते विद्यालय, साकोरे मिग येथील महेंद्रसिंग राजपूत यांची स्वीकृत संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे.

**एकूण सभासद ४८७ मार्च २०२४ अखेर पतसंस्थेत १५ कोटी ५ लाख रुपयांच्या ठेवी,भागभांडवल ८ कोटी ४० लाख, कर्जवाटप २४ कोटी ०७ लाख, निधी २ कोटी ३६ लाख, गुंतवणूक १ कोटी २८ लाख, खेळते भागभांडवल २७ कोटी ४८ लाख, निव्वळ नफा ७५ लाख ६४ हजार झालेला आहे.**

याप्रसंगी नवनिर्वाचित चेअरमन खासदार भास्करराव भगरे यांनी सर्वांना विश्वासात घेऊन संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून संस्थेच्या प्रगतीचा आलेख निश्चितच उंचावणार असल्याचे सांगितले,

यावेळी संस्थेचे संस्थापक शिवाजीराजे निरगुडे,संचालक खासदार भास्करराव भगरे, खासदार राजाभाऊ वाजे,रामराव बनकर,बाळासाहेब गुंजाळ यांनी मनोगत व्यक्त केले,

याप्रसंगी सहायक निबंधक कांतीलाल गायकवाड,संस्थापक चेअरमन कैलास भारती, संचालक तथा खासदार भास्करराव भगरे, निफाड नगरपंचायतीचे नगरसेवक तथा संचालक साहेबराव बर्डे,बाळासाहेब सोनवणे,रामराव बनकर,राहुल दवते,बाबा गुंजाळ,गणेश महाले,किरण जाधव,बाळकृष्ण वाजे,भगीरथ सोनवणे,सोनाली होळकर,हेमलता जाधव आदी संचालक तसेच सुनील होळकर, व्यवस्थापक रतन दिवटे व ज्ञानेश्वर धाटबळे आदी उपस्थित होते,

# उल्हास नवभारत साक्षरता तालुकास्तरीय मेळावा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी:- उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत तालुकास्तरीय उल्हास नवभारत साक्षरता मेळावा ब्रह्मानंद हायस्कूल दोडी या ठिकाणी उत्साहात संपन्न झाला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. ब्रह्मानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पांडूरंग केदार होते. मेळाव्याचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी राजेश ढामसे यांच्या हस्ते झाले.

व्यासपीठावर श्री. ब्रह्मानंद स्वामी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष के.पी.आव्हाड, प्रशासनाधिकारी गणेशआव्हाड, प्राचार्य एस. जी. सोनवणे , उपमुख्याध्यापक एन.पी. काकड,केंद्र केंद्रप्रमुख विजय निरघुडे, विजय खैरनार ,शिवाजी बर्गे, तानाजी पवार ,नवनाथ आढाव ,बाळासाहेब फड, संजय बोरसे, संजय आव्हाड, रामकृष्ण पाटील, उत्तम पवार, संदीप लेंडे, बागड ,भालेराव, संदीप गिते आदी उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .उल्हास नवभारत साक्षरता यशोगाथा अहवालचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

तालुक्यातील १६ केंद्रांनी १६ स्टॉलची मांडणी केलेली होती .डुबेरे केंद्राने प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया, पाथरेचे वाहतूक संबंधी, किर्तांगळीचे



आपले हक्क, दापूरचे डिजिटल साक्षरता , चासचे महाराष्ट्राची लोककला ,मुसळगावचे पारंपारिक खेळ, वावीचे पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर आधारित खेळ, ठाणगावचे बाळाची निगा, लसीकरण व आहार, दापूरचे आहार आणि आरोग्य, विंचूर दळवी चे दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञान,सोनांबेचे डिजिटल साक्षरता, पैशाची देवाण-घेवाण व शेतीविषयक , दोडीचे डायर प्लॅन, ब्राह्मणवाडेचे सर्व विषय तसेच शहा,बारागाव पिंप्री व मऱ्हाळ या केंद्रानीही विविध विषयावर स्टॉल मांडणी केली होती.

## डुबेरे केंद्राचा मतदार जनजागृती स्टॉल ठरला लक्षवेधी

शिक्षण विस्तार अधिकारी कैलास सांगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी हा मेळावा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पांडुरंगशेठ केदार मेळाव्याचे कौतुक करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी व शिक्षक यांच्यात उत्तम संवाद साधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे केदार म्हणाले.

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे उद्घाटक गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे म्हणाले की, निरक्षर लोकांना साक्षर करून त्यांना काळानुरूप बदलणाऱ्या गोष्टी शिकविण्यासाठी उल्हास नवभारत साक्षरता हा कार्यक्रम शासनाने आयोजित केलेला आहे.निरक्षर लोकांना साक्षर करून त्यांना सर्व क्षेत्रात ज्ञान देणे आवश्यक आहे.

या मेळाव्यात डुबेरे केंद्राचा मतदान जनजागृती स्टॉल लक्षवेधी ठरला.या प्रसंगी गटशिक्षण अधिकारी राजेश डामसे, बीट विस्तार अधिकारी कैलास सांगळे यांचेसह सर्व केंद्रप्रमुख तसेच असंख्य शिक्षकांनी प्रत्यक्ष मतदानाचा पवित्र हक्क बजावला.हा स्टॉल यशस्वितेसाठी डुबेरे केंद्राचे केंद्रप्रमुख विजय निरगुडे ,केंद्रातील शिक्षक ज्ञानेश्वर खुर्चे, अशोक पांगारकर , राजेंद्र कोकाटे , सोमनाथ गिरी , रफिक शेख , कैलास पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

पाटपिंपरी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी ' संस्कृती आपली भारी ' या विषयावर नाटिका सादर केली. सूत्रसंचालन संदीप तांबे यांनी तर आभार केंद्रप्रमुख उत्तम पवार यांनी मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी विविध केंद्रातील शिक्षकांसह दोडी हायस्कूल मधील शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेतले.

## स्वेरीमध्ये भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली अर्पण

## अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांचे प्रतिपादन

# माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या रूपाने भारताने एक मुत्सद्दी अर्थतज्ज्ञ गमावला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'आधुनिक भारताच्या उभारणीचे शिल्पकार असलेले माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी आयोजिलेल्या आर्थिक धोरणामुळे भारत देश आज जगात एक आर्थिक महासत्ता म्हणून उभा राहत आहे. कै. डॉ.मनमोहन सिंग यांनी देशासाठी दिलेले योगदान हे अतुलनीय आणि अविस्मरणीय असे आहे. डॉ. सिंग यांच्या रूपाने भारताने आज एक मुत्सद्दी अर्थतज्ज्ञ गमावला आहे.'असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय अध्यक्षा श्रीमती मंजुषा मिसकरयांनी केले.

भारताचे माजी पंतप्रधान व जेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.मनमोहन सिंग यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनामुळे स्वेरीमध्ये जेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेचे पूजन अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय अध्यक्षा श्रीमती मंजुषा मिसकरयांच्या हस्ते करण्यात आले.

श्रीमती मंजुषा मिसकरह्या मुख्याध्यापक व प्राचार्यांच्या एका महत्वाच्या सहविचार सभेच्या संदर्भात स्वेरीत उपस्थित होत्या.



यावेळी त्या श्रद्धांजली पर भाषणात भारताचे माजी पंतप्रधान कै. डॉ.मनमोहन सिंग यांच्या कार्यावर प्रकाश टाकत होत्या. प्रथम वर्ष इंजिनिअरींगचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली.

यावेळी सोलापूर जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सौ. स्वाती हवेली, सोलापूर जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी सुर्वे, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस. मठपती, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एम.पी.ठाकरे, प्रशासन अधिष्ठाता डॉ.आर.आर. गिड्डे, पब्लिसिटी व प्रोटोकॉल अधिष्ठाता डॉ. डी.एस.चौधरी, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता डॉ.के.बी.पाटील, प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा. ए.ए.मोटे, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एस.पी.पवार, मॅकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस.बी.भोसले, वर्कशॉप इन्चार्ज प्रा. बी. डी. गायकवाड, प्रा. डी.टी. काशीद, प्रा. एस.एस. गायकवाड, प्रा.विक्रम चव्हाण, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्रा.ए.एस.भातलवंडे, प्राध्यापक वर्ग,शिक्षकेतर कर्मचारी अमोल रोंगे, बालाजी सुरवसे, अमोल रोंगे आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### शर्टाच्या खिशातून चोरट्याने पळविला मोबाईल

सोलापूर : मार्केट यार्ड येथील सिद्धेश्वर बँकेजवळ झोपले असता अज्ञात चोरट्याने शर्टच्या खिशातील दहा हजार रुपये किमतीचा निळ्या रंगाचा रेडमी कंपनीचा मोबाईल चोरून येण्याची घटना नऊ ऑक्टोबर रोजी घडली. याप्रकरणी सुभाष धोंडीराम गुजले (वय-४५,रा.मु.पो बनपुरी




ता.आटपाडी,जि. सांगली,सध्या सोलापूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### दुचाकीला रिक्षाची समोरून धडक

सोलापूर : कामाची पगार घेऊन दुचाकी (क्रमांक एम एच १३ ईजी ५६६६) वरून येताना वाय चौक येथे रिक्षाने रिक्षा (क्रमांक एम एच १३ सिटी ४३३४) च्या चालकाने धडक दिल्याची घटना २५ डिसेंबर रोजी घडली. या प्रकरणी दत्तात्रय तुकाराम पवार (वय-३४,रा.देगाव बसवेश्वर नगर,ता. दक्षिण सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून रिक्षा क्रमांक एम एच १३ सिटी ४३३४) च्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.यात अधिक माहिती अशी की,दुचाकीवरून येताना रिक्षाचालकाने निष्काकाळजीपणे रिक्षा चालवून समोरून धडक दिली आहे. त्यात फिर्यादीच्या उजव्या पायास करंगळीस मार लागून त्याचे हाड फ्रॅक्चर झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल राठोड हे करीत आहेत.

### हँडलॉक करून ठेवलेली दुचाकी पळविली

सोलापूर : हँडल लॉक करून ठेवलेली मोटरसायकल (क्रमांक १३ ए पी ६३८५ ही चोरून नेल्याची घटना २५ डिसेंबर रोजी घडली. या प्रकरणी सुहेल वाहीद शेख (वय-३०,रा.२८७ अग्निशामक दल जवळ,साखर पेठ ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल धुमाळ हे करीत आहेत.


# श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी ९ लाख किंमतीचा सोन्याचा हार अर्पण

## इतर स्वरूपात देखील दान देण्यासाठी विविध प्रकारच्या योजना असून, इच्छुक भाविकांनी मंदिर समितीच्या कार्यालयात समक्ष भेट द्यावी अथवा दुरध्वनीद्वारे संपर्क करावा असे व्यवस्थापक श्रोत्री यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरःश्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर रोजी नाव जाहिर न करण्याच्या अटीवर दानशुर भाविकाने सुर्य कळ्यांचा सोन्याचा हार गोफासह अर्पण केला आहे. त्याचे वजन १३२ ग्रॅम असून, अंदाजे किंमत ९ लाख २६ हजार होत असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

संबंधित दानशुर भाविक हे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत. ते आज सहकुंटुब श्रींच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पंढरपूला आले असता, सदरचे दान दिले आहे. याशिवाय, त्यांनी मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये अन्नदान देखील केले आहे. त्याचा सुमारे १२०० ते १५०० भाविकांनी लाभ घेतला.







श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीला सोने-चांदी वस्तू दान करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध आहे. त्यासाठी दोन सराफाची पूर्णवेळ नियुक्ती व संबंधित भाविकांना संगणकीकृत पावती देण्यात येते. तसेच इतर स्वरूपात देखील दान देण्यासाठी विविध प्रकारच्या योजना असून, इच्छुक भाविकांनी मंदिर समितीच्या कार्यालयात समक्ष भेट द्यावी अथवा दुरध्वनीद्वारे संपर्क करावा असेही आवाहन ही यावेळी व्यवस्थापक श्रोत्री यांनी केले.

# धाराशिव : आरटीओचे तालुकानिहाय मासिक शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिवःउपप्रादेशिकपरिवहन अधिकारी कार्यालय,धाराशिवच्या वतीने जिल्ह्यातील मोटार वाहन चालक/मालक यांच्या सोयीसाठी मोटार वाहन निरीक्षक यांचा सन २०२५ या वर्षातील माहे जानेवारी ते जून या कालावधीत तालुकानिहाय मासिक शिबीर आयोजित केले आहे.

या मासिक शिबीर दौऱ्यात वाहन कर वसुली,मोटार वाहन नोंदणी आणि तपासणी वाहन चालक अनुज्ञप्ती तयार करण्यात येणार आहे.

वर्ष २०२५ मध्ये उमरगा तालूक्यासाठी महिन्यातील १,२,३ व ५ व्या मंगळवारी आयोजन करण्यात आले असून येथे जानेवारी महिन्यात ७,११ आणि १८ तारखेस,फेब्रुवारी महिन्यात ४,११ आणि १८ तारखेस, मार्च महिन्यात ४,११ आणि १८ तारखेस,एप्रिल महिन्यात १,८,१५ आणि २९ तारखेस,मे महिन्यात ६,१३ आणि २० तारखेस,तर जून महिन्यात १,१० आणि १७ तारखेस शिबीर होणार आहे.

नळदुर्ग (तुळजापूर) साठी महिन्यातील दुसरा आणि चवथ्या बुधवारी आयोजन करण्यात आले असून येथे जानेवारी महिन्यातील ८ आणि २२ तारखेस,फेब्रुवारी महिन्यात १२ आणि २५ तारखेस,मार्च महिन्यात १२ आणि २६ तारखेस,एप्रिल महिन्यात ९ आणि २३ तारखेस,मे महिन्यात १४ आणि २८ तारखेस,तर जून महिन्यात ११ आणि २५ तारखेस शिबीर होणार आहे.

परंडा तालूक्यासाठी महिन्यातील २ ऱ्या आणि ४ थ्या गुरुवारी आयोजन करण्यात आले असून जानेवारी महिन्यातील ९ आणि २३ तारखेस,फेब्रुवारी महिन्यात १३ आणि २७ तारखेस,मार्च महिन्यात १३ आणि २७ तारखेस, एप्रिल महिन्यात ११ आणि २४ तारखेस,मे महिन्यात ८ व २२ तारखेस,तर जून महिन्यात १२ आणि २६ तारखेस शिबीर होणार आहे.

लोहारा तालूक्यासाठी प्रत्येक महिन्यातील ३ ऱ्या शुक्रवारी आयोजन करण्यात आले असून जानेवारी महिन्यातील २४ तारखेस, फेब्रुवारी महिन्यात २१ तारखेस,मार्च महिन्यात २१ तारखेस,एप्रिल महिन्यात २५ तारखेस,मे महिन्यात १६ तारखेस,तर जून महिन्यात २० तारखेस शिबीर होणार आहे.

भूम तालूक्यासाठी प्रत्येक महिन्यातील ३ ऱ्या गुरुवारी आयोजन करण्यात आले असून जानेवारी महिन्यातील १६ तारखेस, फेब्रुवारी महिन्यात २० तारखेस,मार्च महिन्यात २० तारखेस,एप्रिलमध्ये १७ तारखेस, मे महिन्यात १५ तारखेस,जून महिन्यात १९ तारखेस शिबीर होणार आहे.

वाशी तालूक्यासाठी प्रत्येक महिन्यातील ३ ऱ्या बुधवारी आयोजन करण्यात आले असून जानेवारी महिन्यातील १५ तारखेस, फेब्रुवारी महिन्यात १७ तारखेस,मार्च महिन्यात १९ तारखेस,एप्रिल महिन्यात १६ तारखेस, मे महिन्यात २१ तारखेस, तर जून महिन्यात १८ तारखेस शिबीर होणार आहे.

कळंब तालूक्यासाठी प्रत्येक महिन्यातील २ रा व ४ थ्या बुधवारी आयोजन करण्यात आले असून जानेवारी महिन्यातील १३ आणि २७ तारखेस, फेब्रुवारी महिन्यात १० व २४ तारखेस, मार्च महिन्यात १० आणि २४ तारखेस,एप्रिल महिन्यात २१ व २८ तारखेस,मे महिन्यात १९ व २६ तारखेस, तर जून महिन्यात ९ व २३ तारखेस शिबीर होणार आहे.

मासिक शिबीर दौऱ्याच्या दिवशी जर सुट्टी जाहिर झाली तर शिबीर दौरा दुसऱ्या दिवशी कार्यालयीन दिवशी घेण्यात येईल. अर्ज स्विकारण्याची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत राहील.असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, धाराशिव यांनी कळविले आहे.

### चाकूचा धाक दाखवून मोबाईल पळविला

सोलापूर : मार्केट यार्ड येथे पिकपमध्ये ठेवलेले झोपले असता पिक अपमधील उडीदाचे पोते काढताना कोण आहे असे विचारले असता खिशातील चाकू काढून गळ्याला लावत पंधरा हजार सहाशे रुपये किमतीचा सॅमसंग गॅलेक्सी ए २२ कंपनीचा मोबाईल काढून घेतल्याची घटना २५ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी अर्जुन मल्लाप्पा मुलगोड (वय-२५,रा.१५६ वीरभद्रेश्वर नगर, लच्यान,जि. विजापूर कर्नाटक) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात तीन इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ढेरे हे करीत आहेत.

## तालुकास्तरावर स्वाधार योजनेची व्याप्ती वाढवावी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या मागणीला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : तालुकास्तरावर स्वाधार योजनेची व्याप्ती वाढवावी ही सम्यक विद्यार्थी आंदोलनाची अनेक वर्षापासून असलेली मागणी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मान्य केली आहे.

वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य तथा सम्यक विद्यार्थी आंदोलन सल्लागार समिती सदस्य महेश भारतीय सर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्व लढाऊ विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तालुक्यातील वस्तीगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मर्यादित जागा असल्यामुळे वसतिगृह प्रवेशापासून विद्यार्थी वंचित राहत होते त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना समोर जावे लागत होते.

त्यामुळे वस्तीगृहात विद्यार्थ्यांना प्रवेशाची जागा वाढवून द्यावी किंवा यावर काहीतरी उपाययोजना करण्यात यावे या संदर्भात समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आणि अधिकारी यांच्यासोबत सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे यांनी अनेक वेळा चर्चा केली होती.

## गरिबांच्या पोरानं नाव कमवलं आणि गावाचं नाव राज्यात उज्वल केलं : मा .आ. दीपक आबा साळुंखे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोल्याचं शेवटचे टोक म्हणजे डिकसाळ येथील ऊसतोड कामगाराचा मुलगा शशिकांत जगू चव्हाण याने परिस्थितीशी झुंज देऊन राज्यातील क्रॉस कंट्री स्पर्धेत यशस्वी गरुड झेप घेत द्वितीय क्रमांक पटकावला यशाच्या मानकरी ठरला आहे म्हणून या निमित्ताने शिवसेनेचे नेते दीपक आबा साळुंखे पाटील यांनी विजेत्या तरुणाचा शाल पुष्पगुच्छ, देऊन सन्मान केला आहे. यासह या विद्यार्थ्यांचा आदर्श तालुक्यातील इतर तरुणांनी घ्यावा अशी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत यास गरिबांच्या पोरांना नाव कमवलं आणि गावचं नाव राज्यात उज्वल केलं असेही ते उद्गार काढले.



यावेळी सरपंच मधुकर करतांडे ग्राम पंचायत सदस्य रणजीत गगने, पारे ग्राम पंचायतचे माजी सरपंच संतोष पाटील युवक नेते राजाभाऊ गुजले आदी उपस्थित होते.

सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या क्रॉस कंट्री या स्पर्धेत सहभाग घेण्याकरिता फी भरण्यासाठी पैशाची टंचाई असताना अशा परिस्थितीमध्ये आई-वडील ऊसतोड करीत असताना परिस्थितीशी संघर्ष करून जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर सोलापूर येथील मैदान गाजवले आणि तालुक्याचे नाव उज्वल केले या निमित्ताने गोरगरीब कुटुंबातील या विद्यार्थ्यांची कौतुक व्हावे त्यांच्यावर शापाशीची थाप पडावी आणि यातून नव्या उमेदीने आणि उत्साहाने पुढील कार्यासाठी प्रेरणा मिळाली म्हणून शिवसेना नेते माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी शशिकांत चव्हाण या धावपटू चा सन्मान केला आहे यासह पुढील वाटचालीसाठी देखील शुभेच्छा दिल्या आहेत म्हणून इतर विद्यार्थ्यांनी आपल्या आपल्या कलागुणांना वाव द्यावा आणि शशिकांत चव्हाण सारखे यश मिळवून आपले गावचे व तालुक्याचे नाव गावमे असे आव्हान केले

## लातूर येथे मुख्याध्यापकांचे ६१ वे राज्य स्तरीय शैक्षणिक संमेलन २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे ६१ वे राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी थोरमोठे लॉन्स, ओंसा रोड, लातूर येथे होणार असून या* शैक्षणिक संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री नामदार दादाजी भुसे यांच्या हस्ते होणार आहे.



नुकतेच महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव एस.बी. देशमुख, पदाधिकारी ए.के. खालकर, महेंद्र जोंधळे, भागिनाथ घोटेकर, अनिल निकम, जितेंद्र लोंढे यांनी ना . दादासाहेब भुसे यांची भेट घेऊन त्यांना आमंत्रित केले असून. या शैक्षणिक संमेलनात महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा,* पश्चिम महाराष्ट्र येथील ३६ जिल्ह्यातून ६००० ते ७००० मुख्याध्यापक उपस्थित राहणार असल्याची माहिती पश्चिम महाराष्ट्र राज्याचे मुख्याध्यापक संघाचे सचिव* एस.बी. देशमुख यांनी दिली.

या संमेलनासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना . देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे, शिक्षण मंत्री नामदार दादाजी भुसे, कृषी मंत्री नामदार माणिकरावजी कोकाटे, शिक्षक* आमदार किशोरभाऊ दराडे, शिक्षक आमदार विक्रमजी काळे, पदवीधर आमदार सत्यजित तांबे, शिक्षण आयुक्त सुसज मांढरे, शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी, राज्य मंडळाचे अध्यक्ष गोसावी हे सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या संमेलनात विविध शोधनिबंध सादर होणार असून नवीन शैक्षणिक धोरण, पाचवी ते आठवी विद्यार्थी अनुत्तीर्ण करण्याचा संदर्भ, विनाअनुदानित तुकड्यांना मान्यता देणे, अनुदान देणे, शहरी व ग्रामीण भागासाठी विद्यार्थी अट शिथिल करणे, शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देणे, विद्यार्थी गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणे या विषयांवर खुली चर्चा होणार आहे. या संमेलनासाठी प्रमुख व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती अखिल महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी, अध्यक्ष के. एस. ढोमसे, वसंत पाटील, अशोक मोरे, प्रकाश देशमुख, एस. आर. कदम, सतीश जगताप, विलास भारसखरे, संजय शिप्परकर, जे.एस. पैठणे, मोहन सोनवणे, अशोक पारधी, नंदकुमार बारावकर यांनी महाराष्ट्रातील मुख्याध्यापकांना या शैक्षणिक संमेलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

**महाराष्ट्र राज्यासह कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश राज्यातून पूजा नोंदणी**

**ऑनलाईन पूजा नोंदणीसाठी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

# श्री. विठ्ठलाच्या नित्यपुजेची माहे मार्च २०२५ पर्यंत संपूर्ण नोंदणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या सर्व पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून, दि. ०१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा यांची ऑनलाइन नोंदणी दि. २६ डिसेंबर पासून सुरु करण्यात आले. या नोंदणीस भाविकांनी चांगला प्रतिसाद दिल्याने दि. ३१ मार्च पर्यंतच्या श्री विठ्ठलाच्या नित्य पूजेची संपूर्ण नोंदणी झाली असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

मंदिर समितीच्या वतीने दि. १ ऑक्टोबर पासून ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात आली होती. याद्वारे पहिल्या टप्प्यात दि. ७ ऑक्टोबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील पुजा उपलब्ध करून दिल्या होत्या. त्यानंतर दिनांक २६ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० पासून दि. ०१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील दुसऱ्या टप्प्यातील पुजा उपलब्ध करून दिल्या होत्या. सदर कालावधीत उपलब्ध झालेल्या पुजेमधून विठ्ठलाच्या संपूर्ण नित्यपुजेची नोंदणी झाली आहे. याशिवाय, रूक्मिणीमातेच्या नित्यपुजा, पाद्यपुजा व तुळशीपूजा देखील नोंदणी झाल्या आहेत. यामधून मंदिर समितीला आतापर्यंत ४१ लाख ९३ हजार इतके देणगी मुल्य मिळाले आहे.

तसेच दुसऱ्या टप्प्यातील दोन्ही कडील पाद्यपुजा, तुळशीपूजा व रूक्मिणीमातेच्या नित्यपुजा अजूनही नोंदणीसाठी शिल्लक असून, https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून भाविक भक्तांनी आवर्जून पूजेची नोंदणी करावी. दुसऱ्या टप्प्यात देखील भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून, महाराष्ट्र राज्यासह आसाम, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश राज्यातून पूजा नोंदणी झालेली आहे. ऑनलाईन पध्दतीने पुजा उपलब्ध करून दिल्यामुळे भाविकांना घरबसल्या पुजा नोंदणी करता येत आहे, याबाबत भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे. श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाईन नोंदणीची सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.



## थोडक्यात...

### घरफोडी; एक लाख तीस हजारांचा ऐवज पहशा

सोलापूर : संगमेश्वर नगेर अक्कलकोट रोड येथून बंद घराचे कुलूप तोडून कपाटमधील एक लाख तीस हजार रुपये किमतीचा ऐवजी चोरून नेल्याची घटना २५ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी स्टिपन सुनील कुमार पवार (वय-३४,रा.४०३ हाईट सोसायटी दक्षिण सदर बाजार) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहेत.

### दुचाकी पळवली

सोलापूर : अश्विनी हॉस्पिटल येथे हँडल लॉक करून ठेवलेली (दुचाकी क्रमांक एम एच १३ ए ई २०२६) ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १६ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी महेश तानाजी पाटील (वय-२८.रा.मुपो कलाहंगारा,जि.गुलबर्गा,रा.कर्नाटक) यांनी सदर बाझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेच्या पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

# अकलूज नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक नितीन पेटकर अँटी करप्शनच्या जाळ्यात

## दोन लाख रुपयांच्या लाचेची केली मागणी; पोलिसांनी सापळा लावून केली कार्यवाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अकलूज नगर परिषद स्वच्छता निरीक्षक नितीन पेटकर अँटी करप्शन च्या जाळ्यात अडकला. पोलीस उपाधीक्षक गणेश श्री गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री गणेश पिंगू वाले यांच्या पथकाची दमदार कामगिरी केली.

आरोपी लोकसेवा नितीन सिद्राम पेटकर वय ४० वर्ष व स्वच्छता निरीक्षक अकलूज नगरपरिषद अकलूज तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर राहणार अक्कलकोट जिल्हा सोलापूर (वर्ग ३) लाच मागणी१,९५०००/ लाखेची मागणी पडताळणी व सापळा दिनांक २५/१२/२०२४ रोजी

हकीकत अकलूज नगर परिषदेने शहरातील साफसफाई करणे कामी मनुष्यबळ पुरवठा करणे करिता प्रसिद्ध केलेले टेंडर तक्रारदार यांच्या संस्थेत मिळाले होते त्याप्रमाणे तक्रारदार यांनी मनुष्यबळ पुरवठा किंवा केला होता. यातील असलेले यांनी तक्रारदार यांच्याकडे कामगाराच्या मासिक वेतन बिल काढण्यासाठी वेतन बिलाच्या तीन टक्के रक्कम वर्ग ऑर्डर दिल्याच्या मोबदला एक लाख ५० हजार रुपये असे एकूण एक लाख ९५ हजार रुपये मागणी केल्याने मागणीवरून लाचेची मागणी केल्यावरून पडताळणी कार्यवाहीमध्ये निष्पन्न




झाल्याने त्यांच्यावर अकलूज पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांबलदार एसएसआय कोळी पोलीस हवालदार नरोटे राहुल गायकवाड गर्व नेमणूक सोलापूर

परवेक्षक अधिकारी श्री गणेश कुंभार पोलीस उपाधीक्षक प्रदीप सोलापूर मार्गदर्शन अधिकारी

श्री . शिरीष सरदेशपांडे पोलीस अधीक्षक पुणे परीक्षा डॉक्टर शितल जानवे खराडे अप्पर पोलीस अधीक्षक तालुका पोलीस जिल्हा पुणे.

मा आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचनालय बेलापूर नवी मुंबई

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की आपणास कोणी शासकीय अधिकारी व कर्मचारी स्वतः अगर खाजगी समाजा मदतीने कोणतीही शासकीय काम करण्यासाठी अगर न करण्यासाठी मागणी करीत असल्यास तात्काळ लाच मुदत पाठिंबक विभाग सोलापूर येथे संपर्क साधावा.

## ‘आंबेडकरी आई’ ग्रंथाचे आज प्रकाशन

ठाणे/प्रतिनिधी, मिलिंद जाधव : भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेत दलित समाजातील अनेक महिलांनी आपल्या मुलींना उच्चशिक्षित केलेले आहे. अशा निवडक अज्ञात, आदर्श ४२ मातांची समाजाला ओळख करून देणारा एक आगळा ग्रंथ ' आंबेडकरी आई ' येत्या शनिवारी २८ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईत प्रकाशित होणार आहे. संध्याकाळी ४ वाजता दादर ( पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात हा प्रकाशन समारंभ आंबेडकरी स्त्री संघटनेने आयोजित केला आहे. अर्थतज्ज्ञ,माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील या समारंभात डॉ. सिसिलिया कार्व्हालो, प्रा. डॉ. अजित मकदुम, डॉ. प्रज्ञा दया पवार हे प्रमुख वक्ते आहेत.' आंबेडकरी आई ' या ग्रंथाचे संपादन प्रा. आशालता कांबळे आणि डॉ. श्यामल गरुड यांनी केले आहे.

## आमदार मनोज कायंदे यांचा एक कॉल; बंद अवस्थेत पडलेली डीपी ९६ तासामध्ये सुरू

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सतत शेतकरी कुठल्या ना कुठल्या कारणाने नेहमीच अडचणीत असल्याने शेतकऱ्याला नाहक त्रास भोगाव लागतो पळसखेड चक्का येथील गेल्या एक वर्षापासून शेतामध्ये डीपी बंद अवस्थेमध्ये होती म्हणून शेतकऱ्याचे खरीपचे पीक तर गेलेच पण रब्बीचे पीक सुद्धा हातामधून जाणार असल्याने शेतकरी हवालदिल झाला होता म्हणून

शेतकरी पळसखेड चक्का येथील दिनांक २३ डिसेंबर रोजी आमदार श्री मनोज कायंदे यांची भेट घेतली आणि त्यांना सगळ्या समस्या समजून सांगितल्या आणि शेतकऱ्याला रब्बी पिकाला लाईट नसल्यामुळे पीक हातातून जाणार आहे असे सांगितल्यानंतर लगेच





त्यावर त्यांनी लगेच अधिकाऱ्याला सूचना देऊन पळसखेड चक्का तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा चक्का येथील डीपी ताबडतोब बसवा असे आदेश दिल्यानंतर आज दिनांक २७ डिसेंबर रोजी येथील डीपी बसवण्यात आल्यामुळे येथील शेतकऱ्यांच्या मनामध्ये एक आनंद व्यक्त करण्यात येत आहे आता रब्बीचे पीक शेतकऱ्यांची गहू हरभरा शाळु आणि बीज उत्पादक शेतकरी शेडनेट यांना आणि या शेतकऱ्यांना मिळाला दिलासा यावेळी उपस्थित शेतकरी शेतकरी योद्धा कृती समिती चे समन्वय श्री बालाजी सोसे, श्री अर्जुन मुंडे साहेब, श्री गणेश सोसे ग्रामपंचायत सदस्य, पांडुरंग सोसे, प्रमोद नागरे, राहुल आंधळे, धनंजय सोसे, आधी शेतकरी उपस्थित होते.

## उल्हास मेळाव्यात डाळिंब केंद्राचा प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : उमरगा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन व उल्हास मेळावा चे एकत्र आयोजन तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली केलेले होते.




तालुक्यातील १२ केंद्राच्या केंद्रप्रमुखांना नव साक्षर भारत अंतर्गत उल्हास मेळावा यात वेगवेगळे विषय दिलेले होते.

डाळिंब केंद्रासाठी केंद्राचे केंद्रप्रमुख कोकळगावे अब्दुल कादर यानी साक्षरतेच्या प्रसारासाठी समाज माध्यमाचा योग्य वापर असा विषय घेऊन, आपल्या कल्पकतेतून केंद्रातील विद्यार्थ्यांनी धनराज फुरडे यांच्या मदतीने साक्षरता गीत नृत्या मधून सादर केले. यातून निरक्षणांना साक्षर होण्यास संदेश दिले.

विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहून तालुक्याचे आमदार प्रवीणजी स्वामी, गटशिक्षणाधिकारी बिराजदार, विस्तार अधिकारी मोहिते , कार्यालयीन विस्तार अधिकारी कदम , जोशी, केंद्रप्रमुख गोपी पवार, साधन व्यक्ती राठोड यांनी कौतुक केले. विद्यार्थी सादरीकरणास शाळेतील शिक्षक अंकुश पवार, जमाल पाशा खैराटे, सुनिता पोद्दार व देवानंद सुतार यांनी सहकार्य केले.

## श्री खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेच्या अनुषंगाने ३० डिसेंबर रोजी वाहतुकीत बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर तालुक्यातील जेजुरी येथे ३० डिसेंबर रोजी श्री खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेच्या अनुषंगाने वाहतूक कोंडी होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून वाहतुकीत बदल करण्यात आल्याचे आदेश प्र. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी संतोष पाटील यांनी जारी केले आहेत.

वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून ३० डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजेपासून ते रात्री १२ वाजेपर्यंत



सोमवती अमावस्या यात्रेकरीता येणारी हलकी व इतर वाहने वगळून जड-अवजड वाहतूक बंद करुन अन्य पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

जेजुरी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण हद्दीतील वाहतूक बदल: सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथून पुणे येथे जाण्याकरीता जेजुरी-सासवडकडे येणारी वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करुन त्यावरील वाहने नीरा- मोरगाव- सुपा ते केडगाव चौफुला मार्गे सोलापूर महामार्गाने पुणेकडे वळविण्यात येत आहे. पुण्याकडून बारामतीकडे येणारी वाहतूक बेलसर- कोथळे- नाझरे- सुपे- मोरगाव रोड मार्गे बारामती किंवा फलटण या मार्गे वळविण्यात येत आहे.

सुपा पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण हद्दीतील वाहतूक बदल: बारामती व नीरा बाजूकडून जेजुरी मार्गे पुणे बाजूकडे जाणारी वाहनांची वाहतूक बंद करुन ती मोरगाव-सुपा-केडगाव चौफुला मार्गे सोलापूर महामार्गाने पुणेकडे वळविण्यात येत आहे.

सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण हद्दीतील वाहतूक बदल: पुणे बाजूकडून जेजुरी मार्गे फलटण-सातारा बाजुकडे जाणारी वाहनांची वाहतूक पुर्णपणे बंद करुन सासवड-नारायणपूर-कापूरहोळ मार्गे सातारा-फलटण किंवा सासवड-वीर फाटा-परींचे-वीर-वाठार मार्गे लोणंद या मार्गे वळविण्यात येत आहे.

वाहतुकीस लावलेले निर्बंध ३० डिसेंबर रोजीच्या 'श्री खंडोबा देवाची सोमवती यात्रे'करीता येणाऱ्या हलक्या वाहनांसाठी शिथील राहतील. नागरिकांनी वाहतुकीत केलेल्या बदलाची नोंद घेवून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## पावणे तीन लाख रुपयांचे सोन्याचे कडे परत करणाऱ्या तरुणांचा चंदुकाका सराफ अँड सन्स इंदापूर शाखेच्या वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापुर: चंदूकाका सराफ अँड सन्स शाखा इंदापूर या शाखेच्या ओपनिंग कार्यक्रमाच्या दिवशी इंदापूर तालुक्यातील गलांडवाडी नं १येथील सचिन जाधव हे हातातील चांदीचे कडे खरेदी करण्यासाठी गेले असता नजर चुकीने चांदीच्या कड्या ऐवजी सोन्याचे कडे साधारण किंमत पावणे तीन लाख रुपये एवढ्या रकमेचे कडे सचिन जाधव यांना आले होते .

घरी गेल्यानंतर ते कडे पाहिले असता त्यांना ते सोण्याचं असल्याचे समजताच सह कुटुंब परत येऊन चंदुकाका सराफ अँड सन्स या शाखेच्या कर्मचार्यांना बोलाऊन ते परत केले.

चंदुकाका सराफ अँड सन्स चे मॅनेजर यांनी सचिन जाधव यांचे आभार मानले सहपरिवाराचा सत्कार देखील केला.

हल्लीच्या जगात इमानदार माणसांची संख्या खूप कमी झालेली असून त्यांच्या या इमानदारीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात व भक्ती भावात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री समर्थ सद्गुरु ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकरांचा १११ पुण्यतिथी उत्सव श्रीराम मंदिर ध्यान मंदिर सांगोला येथे दिनांक १६ डिसेंबर ते दिनांक २५ डिसेंबर च्या दरम्यानक्ष साजरा केला गेला यानिमित्त दीक्षा भजन मौन गायन कीर्तन प्रवचन भजन रोज सकाळी सहा वाजता काकडा व सामुदाय जप राम मंदिर येथे संपन्न झाले. पंढरपूर येथील ह.भ.प. डॉक्टर जयवंत महाराज बोधले यांचे राम म्हणता रामाचे होईजेया विषयावर तीन दिवस स्वभावी अशी प्रवचन याला संपन्न झाली तसेच रायगड येथील सेवेकरी ह भ प. राघवेंद्र बुवा देशपांडे यांचे नारदीय कीर्तन झाले तर ह भ प. गुरुनाथ महाराज कोटणीस सांगली यांचे प्रवचन त्याचबरोबर यांचे दयानंद बनकर व त्यांचे सहकाऱ्यांचा भजन संध्या हा भागवत भक्ती गीते अभंग गवळणी सदाबहार कार्यक्रमाने संपन्न झाला.

बुधवारी शुभांगी कवठेकर यांचे पुण्यतिथी चे किर्तन व श्रीराम महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली व श्रीमती कवठेकर यांना तबल्याची साथ श्रेया



कुलकर्णी यांनी तर हार्मोनियम साथ शशिकांत लाटणे यांनी केली सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी यांनी केले त्यानंतर महाराजांची पालखी व नगर प्रदक्षिणा शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली व दुसरी ध्यान मंदिरात आरती व महाप्रसाद होऊन उत्साहजी सांगता झाली.

१२० क्लासेस शिक्षक उत्कृष्ट गुरूवर्य पुरस्काराने सन्मानित होणार

प्रा. युवराज कराड यांनी दिली माहिती

# गुरुकुल फाउंडेशन व पीसीसीडीएच्या वतीने रविवारी व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा कॉचिंग क्लासेस संचालक संघटना पीसीसीडीए व गुरुकुल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, रविवार दि. २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता, मुंबई नाका येथील कोर्टयार्ड या पंचतारांकित हॉटेल येथे, येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु होत असलेल्या नविन शैक्षणिक धोरणाबाबत शिक्षकांना माहिती व्हावी या उद्देशाने, व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे येचील म



हाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च अँड ट्रेनिंग या सरकारी संस्थेचे आय टी विभागाचे प्रमुख डॉ. योगेश सोनवणे हे प्रमुख व्याख्याते असून, त्यांच्या हस्ते, महाराष्ट्रातील १२० गुणवंत यशस्वी क्लासेस संचालक शिक्षकांचा, उत्कृष्ट गुरुवर्य हा पुरस्कार देउन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष जयंत मुळे आणि गुरुकुल फाउंडेशनचे संचालक प्रा. युवराज कराड यांनी दिली.

यावेळी गुरुकुल फाउंडेशनचे संचालक प्रा युवराज कराड, प्रफुल्ल देशमुख,अल्पेश साळी,नितीन घेगडमल,सुचंद्र माटे,विकास पाटील आदी उपस्थित राहणार असून यांप्रसंगी मयुर जाधव, तेजस बुचके, संतोष बच्छाव, राहुल नागरे, घनशाम अहिरे, किशोर सपकाळे, योगेश बोरसे, विद्या राकडे, गोरक्ष लांडे, सुनीता लांडे, दुर्गेश तिवारी, गणेश कोतकर, दिनेश राठोड, ज्योती शिवले, दिपक शिवले, लिना ठाकरे, गायत्री बागले, जयवंत जाधव, अण्णासाहेब नरुटे, रविंद्र पाटील, गणेश पवार, माधवी चिंतामणी, यशवंत भामरे, रोहीणी भामरे, प्रमोद गुप्ता, अनिल दवणे, धनंजय शिंदे, विक्रमराजे गोसावी, संतोष बत्तीसे, स्नेहल बोडके, सोनाली आहेर, रविंद्र कांकरिया, विवेक भोर, सचिन अपसुंदे, स्वप्नाली अपसुंदे, मुकुंद रनाळकर, हर्षदा हेनरी, सरदार हेनारी, कैलास गीते, गायत्री चौधरी, विक्रांत राजगुरु, दिपाली मोगल, सुनील मोरे, धनंजय भामरे, निशा ठाकरे, प्रतिभा गांगुर्डे, मच्छिंद्र आंडी, सुनिता जोशी, अनंत चांदवडकर, अभिमान पाटील, सचिन डोली, वाल्मीक सानप, उमादेवी विश्वकर्मा, भारती जाधव, हणमंतगुडे, मयुर अहिरे, प्रकाश खैरनार, सागर परेवाल, दिलीप पवार, स्वाती जगताप, कांता घडगे, किती माळी, शाहीन शेख, सुवर्णा रोकडे, मेघा हिरवे, वैशाली भोर, किरण सुर्यवंशी, मनीष सुरसे, अमीन शाह, निलेश दूसे, पवन जोशी, प्रितेश जाधव, मनिष जोशी, कैलास जेजुरे, मयुर ठाकरे, गौरी मंद, निलेश देवरे, प्रार्थना जेजुरे, योगिता भगत, सुनिता पवार, वैशाली उद्योग, सुनील सोळंकी, महेंद्र मंडलिक, अगस्त्य मुनिम, कैलास खताळे, संजय अभंग, दीपाली पिंगळे, अरुण कुशारे, महेश थोरात, संजय कुलकर्णी, राज बंदरे, सुषमा बंदरे, रविकांत यादव, स्वप्निल कदम, विशाल पाटील, प्रदीप घोटेकर, अभिलाष पंडित, रमेश ठाकरे, प्रज्ञा पगार, मोजेश्वर मोजाड, रुपाली अमृतकर, स्नेहल थोरात, सारिका सावंत, रुद्राणी रफाड, रोशन पाटोळे, सविता खताळे विजय खाडे, मनिषा राउत, आर एन अहिरे, गजानन पाडे, वंदना खाडे, किरण पगार, प्रतिभा देवरे, सारिका जोशी, नरेंद्र निकुंभ,कैलास हारदेचो आदी क्लासेस संचालक शिक्षकांचा सन्मान करण्यात येईल.